मुंबई ग्राम पंचायत अधिनियम १९५८ चे कलम ५२ पोटकलम १ प्रमाणे
इमारतीचे बांधकाम करणेस द्यावयाचा परवाना दाखला

# ग्राम पंचायत गोरसई - सावंदे, ता. भिवंडी, जि. ठाणे.

ग्रा. पं. / वशी /
श्री. लियाकतुल्ला मेहंदी हसन चौधरी
श्रीमती हबिबुल्ला मेहंदी हसन चौधरी

दिनांक : १७ /२ /२००९

यांना कळविण्यात येते की, मौजे ~~गोरसई~~ - सावंदे, ता. भिवंडी, जि. ठाणे येथील जुने घर क्र. ________ रा. ~~भिवंडी~~ जि. ठाणे.

सर्व्हे नं. ६२/१ अ/ पै / गावठाण सिटी सर्व्हे नं. ________ चा २३६९ क्षेत्रफळाच्या भुखंडावरील

बांधकाम करणे बावतचा / ~~दुरुस्ती करणे~~ बावतचा दि. ७ /२ /२००९ चा अर्ज दि. ७ /२ /२००९ रोजी मिळाला.

सदर अर्जावर ग्राम पंचायत मासिक सभा दि. १० /२ /२००९ मध्ये विचार विनिमय करुन ठराव क्र. ६ (११)

शासकिय खात्याच्या परवानगीस आधीन राहून, उपरोक्त अर्जानुसार खालील अटी / शर्तीवर बांधकाम करण्यास हे ''ना हरकत परवाना'' पत्र देण्यात येत आहे.

१. मुंबई ग्राम पंचायत अधिनियम १९५८, कलम ५२, पोट कलम ३ अन्वये परवानगी मिळाल्यापासुन १ वर्षाचे आत बांधकामास सुरुवात करावी तसेच पोटकलम ४, ५, ६, च्या तरतुदीचे अनुपालन करणे आपलेवर बंधनकारक राहील.

२. बांधकाम करणेपुर्वी आवश्यक असलेली महसुल खात्याची परवानगी घेणे आवश्यक असुन स. नं. जागा एन.ए.(अकृपक) झालेशिवाय बांधकामास सुरवात करु नये.

३. कलम ५३ च्या तरतुदीचे संपूर्ण बंधन आपल्यावर राहील. त्या नुसार सांडपाण्याची योग्य व्यवस्था करणे. तसेच क्र./ व्ही.पी.एम्./२६९०/२८६५/प्र. क्र. ३४३५/२२ ग्रामविकास विभाग/मंत्रालय १० जुलै १९९२ प्रमाणे शौचालय/ व सांडपाणी पक्के गटार नसल्यास रस्त्यावर आणता येणार नाही.

४. जागेच्या मालकी, वहीवाट संबंधी हरकत वा वाद निर्माण झाल्यास परवानगीस स्थगिती दिली जाईल व जोपर्यंत वाद मिटत नाही तोपर्यंत स्थगिती कायम राहील. सदर वादाचे निराकरण अर्जदाराने करावयाचे असून निराकरण झालेनंतर पंचायतीस कळविले पाहिजे व स्थगिती रद्द करणे बावत परवानगी घेतले शिवाय बांधकाम करता कामा नये.

५. होणारे सर्व बांधकाम आपले मालकीच्या व वहीवाटीच्या जागेत करावयाचे असून छपराचे पडणाऱ्या पाण्यापासून कोणास त्रास होणार नाही याची दक्षता घेणेत यावी.

६. इमारतीच्या आजूबाजूस प्लॅनमध्ये दाखविल्याप्रमाणे मोकळी जागा न सोडल्यास, सदर ''ना हरकत प्रमाणपत्र'' रद्द करणेचा अधिकार ग्राम पंचायत ने राखून ठेवलेला आहे.

७. बांधकाम करताना, बांधकामासाठी वापरले जाणारे मटेरिअल अगर सामान या पासून नागरिकांच्या रहदारीस अडथळा निर्माण होणार नाही, याची खबरदारी अर्जदार यांनी घ्यावयाची आहे.

८. इमारतीचे सांडपाणी व सेप्टीक टँक मधून येणारे सांडपाणी याची व्यवस्था अर्जदार यांनी स्वत: करावयाची आहे.

९. इमारतीचे बांधकाम पूर्ण झाल्यावर व सदरची इमारत निवासासाठी / व्यापारासाठी वापराकरिता योग्य असल्याबाबत वास्तुविशारद यांचा दाखला ग्राम पंचायत ला सादर केल्याशिवाय व कर आकारणी केल्याशिवाय या इमारतीचा कुठल्याही प्रकारे वापर होणार नाही याची खबरदारी अर्जदार यांनी घ्यावयाची आहे.

१०. इमारतीचे बांधकाम करतांना कुठल्याही प्रकारचा गंभीर अपघात झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी अर्जदार यांचेवर राहील.

११. इमारतीचा वापर गोडाऊन म्हणून करावयाचा असल्यास अग्निशमन अधिकारी यांचेकडून ''गोडावूनसाठी योग्य'' असा दाखला प्राप्त झाल्याशिवाय इमारतीचा वापर करु नये.

१२. बांधकामास सुरुवात करण्यापूर्वी सात दिवस आगाऊ बांधकाम केव्हा सुरु करणार याबाबत लेखी ग्राम पंचायत कार्यालयात कळवावे.

१३. परवानगीचे तारखेपासून एक वर्षाचे आत वांधकामास सुरुवात करावी. तशी सुरुवात न केल्यास सदर परवानगी रद्द समजावी व नविन परवानगीसाठी अर्ज दाखल करावा.

१४. ज्या ठिकाणी पाण्याची जलवाहिनी जात असेल त्याचे वर वांधकाम करता कामा नये. तसेच सदर जलवाहिनी पासून (पाच) फूट अंतर सोडून वांधकाम करावे.

१५. गोडाऊन वांधकामा समोरील रस्ते हे सार्वजनिक पंचायतीचे मालकीचे राहतील हे अर्जदार यांना मान्य आहे असे समजून हा ना हरकत परवाना दिला असे.

१६. गोडाऊन अगर इमारत यामध्ये कुठल्याही प्रकारचे स्फोटक द्रव्य पदार्थ व रसायन अथवा ज्यापासून विषारी वायु उत्पन्न होईल असे रसायन पदार्थ ठेवण्यात येऊ नये व अशा प्रकारचे पदार्थ अगर उथर साठा ठेवल्यास तो अनधिकृत समजून त्या वावत होणाऱ्या परिणामास अर्जदार स्वतः जवाबदार राहील.

१७. इमारतीचे अथवा गोडाऊनचे वांधकाम रस्त्यापासून १५ फूट मार्जीन सोडून वांधकाम करावे.

१८. तसेच आपण ज्या व्यक्तिस भाड्याने अथवा विकत दिलेल्या गाळ्यामध्ये वरिल प्रमाणे स्फोटक किंवा विषारी वायू उत्पन्न होईल असा माल ठेवल्यास अर्जदार यांनी मनाई करावी. तसे न केल्यास भाडेकरु किंवा मालक जवाबदार राहील तसेच गोडाऊन मध्ये कोणत्याही व्यवसाय करावयाचा असल्यास त्यासाठी ग्रामपंचायतीची पूर्व परानगी घेण्यात यावी.

१९. इमारतीचे/गोडाऊनचे वांधकाम पूर्ण झाल्यावर ग्राम पंचायत कराची आकारणी झाल्याशिवाय इमारतीचे किंवा गोडाऊन किंवा गाळे भाड्याने देता कामा नये किंवा त्याची विक्री करता कामा नये.

२०. नकाश्यात (प्लॅनमध्ये) दर्शविल्याप्रमाणे वांधकाम करावे.

२१. अर्जात दर्शविल्याप्रमाणे गावठाण / स. नं. ....६२........ हि. नं. ..१..अ.....५..... मधील जागेत .२३६९...

चौ. फुट मापाचे घर / इमारत / गोडाऊन / ..संरक्षण भिंत.. मजली वांधणेस ना हरकत दाखला देणेत येत आहे.

२२. सोवतच्या प्लॅनला मे. मा. जिल्हाधिकारी ठाणे यांचे कडील आगाऊ मंजूरी घेणेची जवाबदारी तुम्हांवर आहे. व राहिल.

२३. नियोजित वांधकामाच्या मजवुतीची जवाबदारी तुम्ही स्वतः मालक व तुमचे आर्किटेक यांचेवर आहे व राहिल. तसेच वांधकामाशेजारी तुमच्याच जागेत २५ रोपे लावून ती वाढविणे तसेच शौचालयाची इमारत वांधण्याची जवाबदारी आहे व राहील.

सोवतच्या नकाश्याच्या (प्लॅनाच्या) ............. प्रति पाठवित आहे.

२४

वरील अटीचा भंग केल्यास परवानगी ( ना हरकत दाखला) रद्द करण्यांत येईल, व कलम ५२ खाली होणाऱ्या कार्यवाहिस पात्र राहावे लागेल. याची नोंद घ्यावी.


दिनांक : १५ / २ / २००८

ग्राम विकास अधिकारी
ग्रुप ग्राम पंचायत गोरसई-सावंदे
ता. भिवंडी जि. ठाणे

सरपंच
ग्रुप ग्रामपंचायत गोरसई-सावंदे
ता. भिवंडी, जि. ठाणे

Traced By

SIMPLICITY IS THE RICH OF SINCERITY
SINCERITY IS SOUL OF SUCCESS




THE SEAL OF THE SUB-REGISTRAR OFFICE BHIWANDI-2
Dist. Thane

SCALE:- 1:1000

N